प्रकरण :- चौथे

# गृहिणीत असलेल्या व्यवस्थापकीय दृष्टिकोनाचा अभ्यास

-----------------------------------------------------------------

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण :- चौथे | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **4. गृहिणीत असलेल्या व्यवस्थापकीय दृष्टिकोनाचा अभ्यास** | 90-124 |
| 4 | प्रस्तावना | 91 |
| 4.1 | नेतृत्व | 92 |
| 4.2 | सहकार्यवृत्ती | 93 |
| 4.3 | कौटुंबिक कार्यात गृहिर्णींचा प्रत्यक्ष सहभाग | 94 |
| 4.4 | नियोजनाप्रमाणे कार्य करणाऱ्या महिला | 94 |
| 4.5 | महिलामध्ये असलेली योग्य निर्णय क्षमता | 95 |
| 4.6 | वेगवेगळया परिस्थितीत घेतले जाणारे निणर्य प्रकार | 95 |
| 4.7 | वेळेचे नियोजन करणाऱ्या महिला | 97 |
| 4.8 | कुंटुंबातील सदस्यांना त्यांच्या कार्याबद्दल प्रोत्साहित करणाऱ्या महिला | 98 |
| 4.9 | वेगवेगळया प्रकारे प्रेरणा देणाऱ्या महिला | 98 |
| 4.10 | कुंटुंबातील व्यक्तिच्या राहणीमानात सुधारणा करणाऱ्या महिला | 99 |

| | | |
|---|---|---|
| 4.11 | कुंटुंबात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या महिला | 100 |
| 4.12 | कुंटुंबात व्यक्तीच्या आरोग्याबद्दल सर्तक राहणाऱ्या महिला | 101 |
| 4.13 | कुटुंबातील सदस्यांशी योग्य समन्वय साधणाऱ्या महिला | 103 |
| 4.14 | कौटुंबिक साधन संपत्तीचे योग्य नियोजन करणाऱ्या महिला | 104 |
| 4.15 | बचतीची सवय लावणाऱ्या महिला | 105 |
| 4.16 | गुंतवणुकीचे स्वरूप | 105 |
| 4.17 | कुटुंबातील सदस्याच्या भविष्यासाठी गुंतवणुक करणाऱ्या महिला | 107 |
| 4.18 | कुटुंबातील कार्यासाठी योग्य व्यक्तिची निवड करणाऱ्या महिला | 108 |
| 4.19 | महिला व संघटन कौशल्य | 109 |
| 4.20 | ध्येयाची निश्चिती करण्याऱ्या महिला | 111 |
| 4.21 | ध्येयाप्रमाणे कार्य करणाऱ्या महिला | 112 |
| 4.22 | गरजेनुसार कार्याची आखणी करणाऱ्या महिला | 113 |
| 4.23 | गरजेनुसार तीव्रतेनुसार कार्याची आखणी करणाऱ्या महिला | 113 |
| 4.24 | कु टुंबातील व्यक्तिची जबाबदारी निश्चित करणे | 114 |

| | | |
|---|---|---|
| 4.25 | कुटुंबातील व्यक्तिला अधिकार प्रदान करणे | 115 |
| 4.26 | कुटुंबातील मानवी शक्तिचा वापर करणे | 116 |
| 4.27 | नवीन तंत्रज्ञानाचा वापर | 116 |
| 4.28 | मनोबलात वाढ करणाऱ्या महिला | 117 |
| 4.29 | मुलांचे शैक्षणिक नियोजन करणाऱ्या महिला | 118 |
| 4.30 | योग्य अंदाज पत्रक करणाऱ्या महिला | 119 |

## प्रकरण :- चौथे

# गृहिणीत असलेल्या व्यवस्थापकीय दृष्टिकोनाचा अभ्यास

**प्रस्तावना**

नेतृत्व ही संकल्पना फार जुनी आहे. व्यक्ती जेव्हापासून समूह करून राहू लागला तेव्हापासूनच त्याला नेतृत्वाची गरज भासू लागली आहे. एकत्र कुटुंबात एकाच कुटुंबातील व्यक्ती समूहरूपाने राहत असतात. कुटुंबातील कर्ता त्या कुटुंबाचा कारभार चालवित असतो. कुटुंबातील इतर व्यक्ती त्या मुख्य व्यक्तीच्या निर्णयानुसार वागत असतात. कार्ये करीत असताना कुटुंबातील इतर व्यक्तींना मार्गदर्शन करणे, कुटुंबाच्या कार्याचे नियोजन करणे, आदेश देणे इत्यादी कार्ये कुटुंबातील मुख्य व्यक्ती करत असते. म्हणजेच एकत्रित कुटुंबाचे नेतृत्व करण्याचे काम कुटुंबाचा कर्ता करीत असतो. तो जो काम करतो त्या कार्याला नेतृत्व असे म्हणतात. प्रत्येक समुहाला नेतृत्वाची गरज असतेच. आधुनिक काळात नेतृत्वाशिवाय समूहाची कल्पनाच करता येत नाही.

सर्व घटकांना कार्यप्रवृत्त करणारा घटक म्हणजे नेतृत्व होय. व्यवसायाच्या व्यवस्थापकाला आपल्या हाताखालील सहाय्यकाला वेळोवेळी मार्गदर्शन करावे लागते. त्यांच्याकडून काम करून घ्यावे लागते काम करण्याबद्यल त्यांना प्रेरणा द्यावी लागते व नियंत्रण ठेवावे लागते. या सर्व कार्याला व्यवस्थापकीय नेतृत्व असे म्हणतात. व्यवसायाचे नेतृत्व जर अयोग्य असेल तर व्यवसायाला यश मिळू शकत नाही. श्री ग्लाअरच्या मते, व्यवसायातील अपयशाचे मुख्य कारण म्हणजे व्यवसायाला लाभलेले

दुबळे नेतृत्व होय आणि व्यवसायाच्या अपयशाला इतर कोणत्याही कारणापेक्षा महत्वाचे कारण ठरते.

## 4.1 नेतृत्व

व्यावसायिक संघटनेची सफलता योग्य व कुशल नेतृत्वावर अवलंबून असते तसेच कौंटुबिक स्वरावर सुध्दा महिलांना वेगवेगळया प्रकारच्या भूमिका पार पाडाव्या लागतात. आई, आत्या, बहिण, मावशी, आजी विविध मार्गदर्शन करण्याचे कार्य महिला करीत असते. कौटुंबिक कार्याचे नेतृत्व हे महिलांकडे असते. मुलांवर चांगले संस्कार करणे, त्यांना चांगले वाईटाची जाणिव करून देण्याचे काम कुटुंबातूनच केले जाते.

महिलांत असलेल्या नेतृत्व गुणांची माहीती पुढील सारणीत दर्शविली आहे.

**सारणी क्र. 4.1**

**नेतृत्व गुण असणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | प्रतिनिधित्व करणे | 147 | 29.4% |
| 2 | मनोधैर्यात वाढ करणे | 153 | 30.6 % |
| 3 | प्रेरणा देणे | 125 | 25.0% |
| 4 | सहकार्याची भावना असणे | 075 | 15.0 % |
| | एकूण | 500 | 100 .0% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.1 नुसार असे दिसून येते की, प्रतिनिधित्व करणाऱ्या महिलांची संख्या 147(29.4%) इतकी आहे, मनोधैर्यात वाढ करणाऱ्या महिलांची संख्या 153 (30.6 %) आहे, प्रेरणा देणाऱ्या महिलांची संख्या 125

(25%) आहे, सहकार्याची भावना असणाऱ्या महिलांची संख्या 75 (15 %) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, मनोधैर्यात वाढ करणाऱ्या महिलांची संख्या 153 (30.6 %) सर्वाधिक आहे.

**आलेख क्र. 4.1**
**नेतृत्व गुण असणाऱ्या महिलांचा आलेख**




## 4.2 सहकार्यवृत्ती

कुटुंबातील व्यक्तिसोबत सहकार्याने व आपुलकीने वागणे. घरात अनेक व्यक्ति असतात. लहान, मोठे सहकार्याचे चांगले संबंध असतात. अडचणीच्या काळात मदत करीत असते. त्यामुळे कुटुंब आनंदी व सुखी समृध्दी होते असते. कुटुंबातील व्यक्तिसोबत सहकार्याने वागणाऱ्या महिलांची सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**सारणी क्र. 4.2**

**कुटुंबातील व्यक्तिसोबत सहकार्याने वागणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | विवरण | महिलांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | सर्वांना सहकार्य करणे | 230 | 46% |
| 2 | कुटुंबातील व्यक्तिच्या समस्या सोडविणे | 140 | 28% |
| 3 | त्यांच्या कार्यात मदत करणे | 130 | 26% |
| | एकूण | 500 | 100.0% |

स्त्रोत:- प्राथमिक सर्वेक्षण

**आलेख क्र. 4.2**

**कुटुंबातील व्यक्तिसोबत सहकार्याने वागणाऱ्या महिलांचा आलेख**




वरील सारणी क्र. 4.2 नुसार असे दिसून येते की, सर्वांना सहकार्य करणाऱ्या महिलांची संख्या 230(46%) आहे तर कुटुंबातील व्यक्तिच्या समस्या सोडविणाऱ्या महिलांची संख्या 140 (28%) इतकी आहे तर कुटुंबातील व्यक्तिच्या कार्यात मदत करणाऱ्या महिलांची संख्या 130 (26%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, सर्वांना सहकार्य करणाऱ्या महिलांची संख्या 230 (46%) सर्वाधिक आहे.

## 4.3 कार्याचे नियोजन करणाऱ्या महिला :

कुटुंबातील कार्य करीत असताना ते कार्य कोणी, कसे किती वेळात करायचे याची आखणी करणे म्हणजे नियोजन होय. गृहिणी घरातील कोणतेही काम करण्यापूर्वी त्या कामाचा कच्चा आराखडा तयार करीत असते, नंतरच ते काम करीत असते. नियोजन केल्याने काम करण्यास सुलभता येत असते. शिक्षण व नियोजन याचा फारच जवळचा संबंध आहे. शिक्षणामुळे नियोजन करण्यास सुलभता येते तसेच नियोजन प्रभावी ठरते. प्राथमिक सर्वेक्षणाव्दारे कार्य करण्यापूर्वी नियोजन करणाऱ्या महिलांची माहिती पुढील सारणीव्दारे दर्शविली आहे.

**सारणी क्र. 4.3**
**कार्याचे नियोजन करणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | कार्याचे नियोजन करणाऱ्या महिला | 432 | 86.4% |
| 2 | नियोजनाशिवाय कार्य करणाऱ्या महिला | 068 | 13.6% |
| | **एकूण** | **500** | **100.00%** |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.3 वरुन असे दिसून येते की, कुंटुंबातील कार्याचे नियोजन करणाऱ्या महिलाची संख्या 432 (86.4%), नियोजनाशिवाय कार्य करणाऱ्या महिलाची संख्या 68 (13.6%) इतकी आहे.

## कौटुंबिक कार्यात गृहिणींचा प्रत्यक्ष सहभाग

गृहिणी व कौटुंबिक कार्य यांना वेगवेगळे करता येत नाही. कुटुंबात गृहिणीचा प्रत्यक्ष सहभाग असतो. कोणतेही कार्य करताना प्रत्यक्ष

सहभागाशिवाय त्या कार्यातील अडचणी लक्षात येत नाहीत. ती प्रत्येक कार्यात मार्गदर्शन, सहकार्य करीत असते.

### 4.4 नियोजनाप्रमाणे कार्य करणाऱ्या महिला :

कोणतेही कार्य करीत असताना ते कार्य नियोजनाप्रमाणे होतेच असे नाही. त्यात परिस्थितीनुसार बदल करावे लागतात. काही अल्पसे बदल असतात तर काही मोठे असतात. त्याबद्दलची माहिती पुढील सारणीत दर्शविली आहे.

**सारणी क्र. 4.4**

**नियोजनाप्रमाणे कार्य करणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | नियोजनाप्रमाणे कार्य करणाऱ्या महिला | 370 | 85.6% |
| 2 | नियोजनात अल्पसा बदल कार्य करणाऱ्या महिला | 052 | 12.1% |
| 3 | नियोजनात मोठे फेरबदल करणाऱ्या महिला | 010 | 02.3 |
| | एकूण | 432 | 100% |

स्त्रोत:- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.4 नुसार असे दिसून येते की, नियोजनाप्रमाणे कार्य करण्याऱ्या 370 (85.6%), महिला सर्वाधिक आहेत. नियोजनात अल्पसा बदल करणाऱ्या महिला 52 (12.1%) , नियोजनात मोठे फेरबदल करणाऱ्या 10 (2.3%) महिला सर्वात कमी आहेत.

यावरून असे स्पष्ट होते की, नियोजनाप्रमाणे कार्य करण्याऱ्या 370 (85.6%), महिला सर्वाधिक आहेत, नियोजनात मोठे फेरबदल करणाऱ्या 10 (2.3%) महिला सर्वात कमी आहेत.

## 4.5 महिलामध्ये असलेली योग्य निर्णय क्षमता :

कुटुंबातील महिलात कार्य करीत असताना योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता जाणून घेण्याचा प्रयत्न केला. काळानुसार, वेळेनुसार त्वरीत व योग्य निर्णय घेण्याची क्षमता महिलांत असल्याचे प्राथमिक सर्वेक्षणाव्दारे दिसून आले आहे. पुढील सारणीत दर्शविले आहे.

**सारणी क्र. 4.5**

**महिलात असलेली निणर्य क्षमता दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | निणर्य क्षमता | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | त्वरीत योग्य निर्णय घेणे | 165 | 33.0% |
| 2 | निर्णयाचा आदर करणे | 207 | 41.4% |
| 3 | परत निर्णय घेण्याची संधी मिळणे | 128 | 25.6% |
| | एकूण | 500 | 100% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.5 नुसार असे दिसून येते की, कुंटुंबातील त्वरीत योग्य निर्णय घेणाऱ्या महिलांची संख्या 165 (33%), निर्णयाचा आदर करणाऱ्या महिलांची संख्या 207 (41.4%) इतकी आहे. परत निर्णय घेण्याची संधी मिळणाऱ्या महिलांची संख्या 128 (25.6%) आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, निर्णय घेण्यात महिलांचा सहभाग असतो. कुंटुंबातील घेतलेल्या निर्णयचा आदर होत असलेल्या महिलांची सर्वाधिक संख्या 207 (41.4%) आहे.

## 4.6 वेगवेगळया परिस्थितीत घेतले जाणारे निणर्य प्रकार :

महिलांना परिस्थितीनुसार निर्णय घ्यावे लागतात. लहान स्वरूपाचे निर्णय, मोठया स्वरूपाचे निर्णय, वैयक्तिक निर्णय, सामुहिक निर्णय, अर्थिक

निर्णय, अर्थिकेत्तर निर्णय, मुलभूत स्वरूपाचे निर्णय असे अनेक निर्णय घ्यावे लागतात.

मुलभूत स्वरूपाचे निर्णय घेताना अनेक घटकाचा विचार करावा लागतो. उदा.नैतिक आचार, मानवी वर्तन. तसेच नैतिक, धार्मिक,सामाजिक, सांस्कृतिक घटकाचा विचार करून जे निर्णय घेतले जातात त्या निर्णयास अर्थिकेत्तर निर्णय असे म्हणतात. पुढील सारणीत निणर्य प्रकार दर्शविलेले आहे.

**सारणी क्र. 4.6**

**वेगवेगळया परिस्थितीत घेतले जाणारे निणर्य प्रकार दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | निणर्याचे प्रकार | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | दैनंदिन निर्णय | 96 | 19.20% |
| 2 | मूलभूत स्वरूपाचे निर्णय | 61 | 12.20% |
| 3 | लहान स्वरूपाचे निर्णय | 58 | 11.60% |
| 4 | मोठया स्वरूपाचे निर्णय | 48 | 09.60% |
| 5 | वैयक्तिक निर्णय | 51 | 10.20% |
| 6 | सामुहिक निर्णय | 63 | 12.60% |
| 7 | आर्थिक निर्णय | 72 | 14.40% |
| 8 | आर्थिकेत्तर निर्णय | 51 | 10.20% |
| | एकूण | 500 | 100% |

स्त्रोत:- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.6 नुसार असे दिसून येते की, कुटुंबातील दैनंदिन स्वरूपाचे निर्णय घेणाऱ्या महिलांची संख्या सर्वाधिक 96(19.2%) आहे. आर्थिक निर्णय व आर्थिकेत्तर निर्णय सर्व प्रकारचे निर्णय कुटुंबातील महिला घेत असतात. सर्वच प्रकारच्या निर्णयात महिलांचा समावेश असतो.

## 4.7 वेळेचे नियोजन करणाऱ्या महिला :

वेळेचे महत्व लक्षात घेवून कोणतेही काम वेळेवर करणाऱ्या महिला कुटुंबात असलेल्या दिसून येतात. म्हणजे वेळेचे नियोजन करून कार्य

करणाऱ्या महिलांची सर्वेक्षणाव्दारे माहीती मिळविली असून त्याचा तपशील पुढील सारणीत दर्शविला आहे.

**सारणी क्र. 4.7**

**वेळेचे नियोजन करणाऱ्या महिलाची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | वेळेचे नियोजन करणाऱ्या महिला | 373 | 74.6% |
| 2 | वेळेचे नियोजन न करणाऱ्या महिला | 127 | 25.4% |
| | एकूण | 500 | 100% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.7 नुसार असे दिसून येते की, वेळेचे नियोजन करणाऱ्या महिलाची संख्या 373(74.6%) आहे, वेळेचे नियोजनाशिवाय कार्य करणाऱ्या महिलाची संख्या 127 (25.4%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, वेळेचे नियोजन करणाऱ्या महिला ह्या सर्वाधिक 373(74.6%) आहे.

## 4.8 कुंटुंबातील सदस्यांना त्यांच्या कार्याबद्दल प्रोत्साहित करणाऱ्या महिला :

कुटुंबातील महिला कुटुंबातील सदस्यांना कार्य करण्यासाठी प्रोत्साहन देत असतात व चांगले कार्य करण्यासाठी प्रेरित करीत असतात. प्राथमिक सर्वेक्षणाद्वारे मिळविलेली माहिती पुढील सारणीत दर्शविण्यात आलेली आहे.

**सारणी क्र. 4.8**

**कुंटुंबातील सदस्यांना त्यांच्या कार्याबद्दल प्रोत्साहित करणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | प्रोत्साहन देणाऱ्या महिला | 485 | 97% |
| 2 | प्रोत्साहन न देणाऱ्या महिला | 015 | 03% |
| | एकूण | 500 | 100.00% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र.4.8 असे दिसून येते की, कुंटुंबातील सदस्यांना त्यांच्या कार्याबद्दल प्रोत्साहित करणाऱ्या महिलाची संख्या 485(97%), कुंटुंबातील सदस्यांना त्यांच्या कार्याबद्दल प्रोत्साहित न करणाऱ्या महिलाची संख्या 15 (3%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, कुंटुंबातील सदस्यांना त्यांच्या कार्याबद्दल प्रोत्साहित करणाऱ्या सर्वाधिक महिलाची संख्या 485(97%), आहे.

### 4.9 वेगवेगळया प्रकारे प्रेरणा देणाऱ्या महिला :

कुंटुंबातील सदस्यांना बक्षिस देवून, स्तुती करून, त्यांच्या आवडीच्या वस्तू देवून कार्य करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेतली जाते. वेगवेगळया प्रकारे प्रोत्साहन देणाऱ्या महिलांची सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**सारणी क्र. 4.9**
**प्रेरणेचे स्वरूप दर्शविणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | अर्थिक स्वरूपात | 093 | 19% |
| 2 | भेट वस्तू स्वरूपात | 157 | 32% |
| 3 | स्तुती करणे | 235 | 49% |
| | एकूण | 500 | 100.00% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.9 नुसार असे दिसून येते की, चांगले काम केल्याबद्दल कुटुंबातील व्यक्तिना अर्थिक स्वरूपात प्रेरणा देणाऱ्या महिलांची संख्या 93(19%), त्यांच्या आवडीच्या पर्यटन स्थळी फिरायला घेवून जाणे, आवडीची भेट वस्तू देवून प्रेरित करणाऱ्या महिलांची संख्या 157(32%), तसेच प्रशंसा, स्तूती करून प्रेरित करणाऱ्या महिलांची संख्या 235(49%) सर्वाधिक आहे. कुटुंबातील व्यक्तिंना सर्व कार्याबद्दल प्रोत्साहित करण्याचे कार्य गृहिणी करीत असतात.

### 4.10 कुंटुंबातील व्यक्तिच्या राहणीमानात सुधारणा करणाऱ्या महिला :

कुटुंबातील व्यक्तिच्या राहणीमानात सुधारणा करण्यात महिलांचा फार मोठा हातभार असतो. राहणीमानात सुधारणा झाल्यामुळे कौटुंबिक विकास होतो. तसेच जीवन स्तर उंचावण्यास मदत होते. कुटुंबातील व्यक्तिच्या राहणीमानात सुधारणा करणाऱ्या महिलांची माहिती पुढील सारणीत दिलेली आहे.

**सारणी क्र. 4.10**

**कुंटुंबातील व्यक्तिच्या राहणीमानात सुधारणा करणाऱ्या महिलाची सारणी**

| अ.क्र. | राहणीमानात सुधारणा करणे | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 387 | 77.6% |
| 1 | नाही | 113 | 22.4% |
| | एकूण | 500 | 100.00% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.10 नुसार असे दिसून येते की, कुंटुंबातील व्यक्तिच्या राहणीमानात सुधारणा करणाऱ्या महिलाची संख्या 387(77.6%), कुंटुंबातील व्यक्तिच्या राहणीमानात सुधारणा न करणाऱ्या महिलाची संख्या 113 (22.4%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, कुंटुंबातील व्यक्तिच्या राहणीमानात सुधारणा करणाऱ्या महिला ह्या सर्वाधिक 387 (77.6%) आहेत.

**4.11 कुंटुंबात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या महिला :**

आधुनिक तंत्रज्ञानाने मानवाचे जीवन अधिक सुखी व समृध्द झाले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर स्वयंपाकघरात व कौटुंबिक जीवनात देखील केला जातो. कुटुंबात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वेळ व श्रम व पैशांची बचत केली जाते. कौंटुंबिक कार्य अधिक सुलभ होण्यासाठी विविध उपकरणांचा महिला वापर करतात. उदा. कुकर, मिक्सर, ओव्हन, वॉशिंग मशिन, सोलार अशा अनेक साधनांचा उपयोग केला जातो. त्यामुळे बाकीचा वेळ दुसऱ्या कार्यासाठी वापरता येतो.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या महिलांचा तपशील पुढील सारणीत दिलेला आहे.

**सारणी क्र. 4.11**

**कुंटुंबात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या महिलाची सारणी**

| **अ.क्र** | **विवरण** | **संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| 1 | आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या महिला | 397 | 79.4% |
| 2 | नवीन तंत्रज्ञानाची माहिती नसल्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर न करणाऱ्या महिला | 073 | 14.6% |
| 3 | आधुनिकतंत्रज्ञानाचा वापर न करणाऱ्या महिला | 020 | 04.0% |
| 4 | कुटुंबातील व्यक्तिचा विरोध असल्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर न करणाऱ्या महिला | 010 | 02.0% |
| | **एकूण** | **500** | **100%** |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.11 नुसार असे दिसून येते की, कुंटुंबात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या महिलाची संख्या 397(79.4%) आहे, नवीन तंत्रज्ञानाची माहिती नसल्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर न करणाऱ्या महिलाची संख्या 73 (14.6%) इतकी आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर न करणाऱ्या महिलांची संख्या 20 (4%) आहे. तर कुटुंबातील व्यक्तिचा विरोध असल्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर न करणाऱ्या महिलांची संख्या 10 (2%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, कुंटुंबात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या महिला ह्या सर्वाधिक 397(79.4%) इतक्या आहेत.

### 4.12 कुंटुंबात व्यक्तीच्या आरोग्याबद्दल सर्तक राहणाऱ्या महिला :

शिक्षण, प्रसारमाध्यमे, टी.व्ही., दूरदर्शन, वर्तमानपत्रे अशा अनेक माध्यमातून माहितीचा प्रसार केला जातो. सर्व लोकांना आरोग्याविषयी मुलभूत माहिती मिळत असते. त्यामुळे आजची महिला आरोग्याबद्दल सर्तक झाली आहे. परंतु दहा वर्षापूर्वी माहितीचा प्रसार मोठया प्रमाणात झालेला नव्हता. म्हणून त्यांना आरोग्याविषयी मुलभूत माहितीचे ज्ञान नव्हते. महिला विविध रोगाच्या प्रतिबंधात्मक उपचाराबद्दल योग्य माहिती नव्हती. आधुनिक प्रगत ज्ञानामुळे माहितीचा प्रसार लवकर होत आहे. कुंटुंबात व्यक्तीच्या आरोग्याबद्दल नेहमी सतर्क राहण्याचे कार्य कुटुंबातील महिला करीत असतात. आजारी कोणतीही व्यक्ति पडू नये यासाठी सतत प्रयत्नशील असतात. विविध प्रकारच्या प्रतिबंधात्मक लसीची माहिती करून घेणे, आहाराविषयी सतर्क राहणे, प्रथोमपचाराची माहिती घेणे, व्यायामाचे महत्व पटवून देणे. विविध प्रकारचे कार्य करीत असतात अशा महिलांची सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**सारणी क्र. 4.12**

**कुंटुंबात व्यक्तीच्या आरोग्याबद्दल सर्तक राहणाऱ्या महिलाची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | आहाराचे ज्ञान असणाऱ्या महिला | 106 | 21.1% |
| 2 | प्रथोमपचाराची माहिती असणाऱ्या महिला | 150 | 30.0% |
| 3 | प्रतिबंधात्मक लसीचे ज्ञान असणाऱ्या महिला | 093 | 18.6% |
| 4 | व्यायामाचे महत्व जाणणाऱ्या महिला | 134 | 26.8% |
| 5 | आहाराचे पुरेसे ज्ञान नसणाऱ्या महिला | 010 | 02.0% |
| 6 | आळस वृत्ती असणाऱ्या महिला | 007 | 01.4% |
| | एकूण | 500 | 100% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.12 नुसार असे दिसून येते की, कुंटुंबातील व्यक्तीच्या आरोग्याबद्दल सर्तक राहणाऱ्या महिला, त्यात आहाराचे ज्ञान असणाऱ्या महिला, प्रतिबंधात्मक लसीची व प्रथोमपचाराची माहिती असणाऱ्या महिला तसेच व्यायामाचे महत्व माहित असणाऱ्या महिलांची संख्या 483 (96.6%) सर्वाधिक असल्याचे दिसून येते. तर आहाराचे पुरेसे ज्ञान नसणाऱ्या महिला, आळस वृत्ती असणाऱ्या महिलांची संख्या 17(3.4%), इतकी असल्याचे दिसून येते.

यावरून असे स्पष्ट होते की, प्रथोमपचाराची माहिती असणाऱ्या महिलांची संख्या 150 (30%) आहे. कुंटुंबातील व्यक्तीच्या आरोग्याबद्दल सर्तक राहणाऱ्या महिलांची संख्या वाढत आहे.

## 4.13 कुटुंबातील सदस्यांशी योग्य समन्वय साधणाऱ्या महिला :

कुटुंबातील सदस्यांना एकत्रिक ठेवण्याचे व त्याच्यात योग्य तो समन्वय साधण्याचे कार्य कुटुंबांतील महिला करीत असतात.

**सारणी क्र. 4.13**

**कुटुंबातील सदस्यांशी योग्य समन्वय साधणाऱ्या महिलाची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | कुटुंबातील सदस्यांशी योग्य समन्वय साधणाऱ्या महिलांची संख्या | 427 | 85.4 % |
| 2 | वैचारिक मतभेदामुळे योग्य समन्वय न साधनाऱ्या महिलांची संख्या | 023 | 04.6 % |
| 3 | अर्थिक समस्यांमुळे योग्य समन्वय न साधणाऱ्या महिलांची संख्या | 050 | 20.00% |
| | एकूण | 500 | 100 .00% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.13 नुसार असे दिसून येते की, कुटुंबातील सदस्यांशी योग्य समन्वय साधणाऱ्या महिलाची संख्या 427 (85.5%) आहे, वैचारिक मतभेदामुळे योग्य समन्वय न साधनाऱ्या महिलांची संख्या 23 (4.6%) इतकी आहे तर अर्थिक समस्यांमुळे योग्य समन्वय न साधणाऱ्या महिलांची संख्या 50 (20%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, कुटुंबातील सदस्यांशी योग्य समन्वय साधणाऱ्या महिलाची संख्या 427 (85.5%) सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

## 4.14 कौटुंबिक साधन संपत्तीचे योग्य नियोजन करणाऱ्या महिला :

कुटुंबासाठी लागणाऱ्या साधन संपत्तीचे योग्य प्रकारे नियोजन करण्याचे कार्य करणाऱ्या कुटुंबातील महिला असतात. योग्य नियोजन करून जास्तीत कुटुंबातील व्यक्तिना समाधान मिळवून देण्याचा सतत प्रयत्न करीत असतात.

**सारणी क्र. 4.14**

**कौटुंबिक साधन संपत्तीचे योग्य नियोजन करणाऱ्या महिलाची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 407 | 81.4 % |
| 2 | नाही | 093 | 18.6 % |
| | एकूण | 500 | 100 % |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.14 नुसार असे दिसून येते की, कौटुंबिक साधन संपत्तीचे योग्य नियोजन करणाऱ्या महिलाची संख्या 407(81.4%) इतकी आहे, कौटुंबिक साधन संपत्तीचे योग्य नियोजन न करणाऱ्या महिलाची संख्या 93 (18.6%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, कौटुंबिक साधन संपत्तीचे योग्य नियोजन करणाऱ्या महिला संख्या 407 (81.4%) सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

## 4.15 बचतीची सवय लावणाऱ्या महिला :

कुटुंबातील व्यक्तिना बचतीचे महत्व पटवून देवून बचत करण्याची सवय लावण्याचे कार्य कुटुंबातील महिला करीत असतात. कोणत्याही चांगल्या सवयी लावण्याचे कार्य हे कुटुंबातून केले जाते.

**सारणी क्र. 4.15**

**बचतीची सवय लावणाऱ्या महिलाची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | बचतीची सवय लावणा-या महिला | 427 | 85.4% |
| 2 | उत्पन्न कमी असल्यामुळे बचत करू न शकणाऱ्या महिलांची संख्या | 060 | 12.0% |
| 3 | माहितीच्या अभावामुळे बचत न करू शकणाऱ्या महिलांची संख्या | 013 | 02.6% |
| | **एकूण** | 500 | 100% |

स्त्रोत:- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.15 नुसार असे दिसून येते की, कुंटुंबातील सदस्यांना बचतीची सवय लावणाऱ्या महिलाची संख्या 427(85.4%), उत्पन्न कमी असल्यामुळे बचत करू न शकणाऱ्या महिलांची संख्या 60 (12.0%) इतकी आहे तर माहितीच्या अभावामुळे बचत न करू शकणाऱ्या महिलांची संख्या 13 (2.6%)

यावरून असे स्पष्ट होते की, कुंटुंबातील सदस्यांना बचतीची सवय लावणाऱ्या महिला ह्या सर्वाधिक 427(85.4%) इतक्या आहेत.

## 4.16 गुंतवणुकीचे स्वरूप :

भविष्यकाळाची चिंता दूर करण्यासाठी वेगवेगळया प्रकारच्या गुंतवणुक केल्या जातात. काही अल्पकाळासाठी असतात तर काही दिर्घकाळासाठी

असतात. भविष्यकाळात उद्भवणाऱ्या अनपेक्षित समस्यांना सामोरे जाण्यासाठी अर्थिक गुंतवणूक करणाऱ्या महिलांची सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**सारणी क्र. 4.16**

**गुंतवणुकीचे स्वरूप दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | दिर्घकाळासाठी केलेली गुंतवणूक | 095 | 19 .00% |
| 2 | मध्यम काळासाठी केलेली गुंतवणूक | 185 | 37 .00% |
| 3 | अल्पकाळासाठी केलेली गुंतवणूक | 110 | 22 .00% |
| 4 | माहितीच्या अभावामुळे गुंतवणूक न करणाऱ्या महिला | 075 | 15 .00% |
| 5 | आर्थिक समस्यामुळे गुंतवणूक न करणाऱ्या महिला | 035 | 07 .00% |
| | एकूण | 500 | 100 .00% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.16 नुसार असे दिसून येते की, दिर्घकाळासाठी गुंतवणूक करणाऱ्या महिलांची संख्या 95 (19%) आहे, मध्यम काळासाठी गुंतवणूक करणाऱ्या महिलांची संख्या 185(37%) आहे, अल्पकाळासाठी गुंतवणूक करणाऱ्या महिला 110(22%) इतकी आहे, माहितीच्या अभावामुळे गुंतवणूक न करणाऱ्या महिलांची संख्या 75(15%) एवढी आहे, तर आर्थिक समस्यामुळे गुंतवणूक न करणाऱ्या महिलांची संख्या 35(7%) एवढी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, मध्यम काळासाठी गुंतवणूक करणाऱ्या महिलांची संख्या सर्वाधिक 185(37%) आहे तर सर्वात कमी आर्थिक समस्यामुळे गुंतवणूक न करणाऱ्या महिलांची संख्या 35(7%) एवढी आहे.

## 4.17 कुटुंबातील सदस्याच्या भविष्यासाठी गुंतवणुक करणाऱ्या महिला :

आपल्या कुटुंबातील सदस्याच्या भविष्याची काळजी प्रत्येकालाच असती. कुटुंबातील व्यक्तिना भविष्यात अडचणी येवू नये यासाठी सतत प्रयत्नशील असते. त्यासाठी विविध ठिकाणी गुंतवणुक करून ती काळजी दूर करण्याचा प्रयत्न केला जातो. गुंतणुक करणाऱ्या महिलांची सारणी पुढील प्रमाणे आहे.

**सारणी क्र. 4.17**

**कुटुंबातील सदस्याच्या भविष्यासाठी गुंतवणुक करणाऱ्या महिलाची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | प्लॉट/जमीन | 145 | 29.0 % |
| 2 | सोने/मौलवान वस्तू | 155 | 31.0 % |
| 3 | मुदत ठेव | 100 | 20.0 % |
| 4 | शेअर्स | 025 | 05.0 % |
| 5 | इतर गुंतवणूक | 075 | 15.0 % |
| | **एकूण** | 500 | 100.0 % |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.17 नुसार असे दिसून येते की, कुटुंबातील सदस्याच्या भविष्यासाठी प्लॉट/जमीन यामध्ये गुंतवणुक करणाऱ्या महिलाची संख्या 145 (29%) इतकी आहे, तर सोने/मौलवान वस्तू यात गुंतवणुक करणाऱ्या महिलाची संख्या 155 (31%) इतकी आहे, मुदत ठेवीत गंतवणूक करणाऱ्या महिलांची संख्या 100 (20%) इतकी आहे, शेअर्स मध्ये गुंतवणुक करणाऱ्या महिलाची संख्या 25 (5%) इतकी आहे, व इतर गुंतवणूकीत 75 (15%) गुंतवणुक केलेली दिसून येते.

यावरून असे स्पष्ट होते की, कुटुंबातील सदस्याच्या भविष्यासाठी वेगवेगळया स्वरूपात गुंतवणुक केली जात असल्याचे दिसून येते.

सोने/मौलवान वस्तू यात गुंतवणुक करणाऱ्या महिलाची संख्या सर्वाधिक 155 (31%) आहे, तर शेअर्स मध्ये गुंतवणुक करणाऱ्या महिलाची संख्या सर्वात कमी 25 (5%) इतकी आहे.

## 4.18 कुटुंबातील कार्यासाठी योग्य व्यक्तिची निवड करणाऱ्या महिला:

व्यवसायात व्यक्तिचे कौशल्ये, पात्रता व त्याच्या शारिरीक क्षमतेनुसार कामाचे वाटप केले जाते. त्याचप्रमाणे कुटुंबात देखील व्यक्तिच्या आवडीनिवडीनुसारच कार्य सोपविले जाते. उदा. बँकेचे ज्ञान व आवड असणाऱ्या व्यक्तिंना बॅकेचे व्यवहार करणे, विविध पदार्थ बनविण्याची आवड असेल तर स्वयंपाक करणे, मुलांना शिकविणे असे आपल्या आवडीचे काम असेल तर ते अधिक चांगले व कार्यक्षमपणे केले जाते.

कुटुंबातील कार्य यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी योग्य कामासाठी योग्य व्यक्तिची निवड करण्याचे कार्य महिला करतात. ते पुढील सारणीवरुन दिसून येते.

**सारणी क्र. 4.18**

**कुटुंबातील कार्यासाठी योग्य व्यक्तिची निवड करणाऱ्या महिलाची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | व्यक्तिच्या आवडीनुसार कामाची विभागणी | 287 | 57.40% |
| 2 | शारिरीक क्षमतेनुसार व कौशल्यानुसार कामाची विभागणी | 113 | 22.60% |
| 3 | अनुभवानुसार कामाची विभागणी | 095 | 19.00% |
| 4 | व्यक्तिची निवड केली जात नाही | 005 | 01.00 % |
| | एकूण | 500 | 100 .00% |

स्त्रोत:- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.18 नुसार असे दिसून येते की, कुटुंबातील कार्यासाठी व्यक्तिच्या आवडीनुसार कामाची विभागणी करणाऱ्या महिलाची संख्या 287 (57.40%) इतकी आहे, शारिरीक क्षमतेनुसार व कौशल्यानुसार कामाची विभागणी  करणाऱ्या महिलाची संख्या 113 (22.60%) इतकी आहे, अनुभवानुसार कामाची विभागणी करणाऱ्या महिलाची संख्या 95(19%) आहे, तर 5 (1%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, कुटुंबातील कार्यासाठी व्यक्तिच्या आवडीनुसार कामाची विभागणी करणाऱ्या महिलाची संख्या 287 (57.40%) सर्वाधिक आहे.

**4.19 महिला व संघटन कौशल्य**

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उद्योग, प्रशासन, खेळ, युध्द, राजनीती, घर अशा सर्वच क्षेत्रात संघटनेचे महत्व स्पष्ट होते. टेरी यांच्या मते, संघटन व्यवस्थापनाचे आव्हानात्मक क्षेत्र आहे. व्यवसायातच नाही तर प्रत्येक क्षेत्रात यशास्वितेचा आधार सुदृढ संघटन आणि समन्वयाची व्यवस्था हा आहे.

ज्या प्रमाणे शरिराविना आत्मा हा प्रभावहीन समजले जाते त्याचप्रमाणे संघटनेशिवाय व्यवस्थापन प्रभावहीन समजले जाते. संघटनेच्या माध्यमातूनच निर्देशन, नियंत्रण, समन्वय इत्यादी व्यवस्थापकीय प्रक्रियांचे संचालन होत असते. संघटन ही व्यवस्थापनाची आधारशीलाच आहे. जर संघटनेच्यायोजनेत काही दोष निर्माण झालेत किंवा त्रुटी राहिल्यास तर व्यवस्थापनाचे कार्य कठीण आणि प्रभावहीन होते. उत्कृष्ट व्यवस्थापनाच्या प्रयत्नांना एक निश्चित दिशा देवू शकते आणि त्याला अधिक कार्यक्षम बनवू शकते. [1]

संघटन ही एक प्रक्रिया आहे. त्यातील कार्य टप्प्याटप्प्याने पार पाडायचे असतात. कुटुंबात अनेक कार्य असतात. आवश्यक असणारी सर्व एकच ध्येय असलेली कार्ये ओळखून जबाबदारी सोपविणे व त्याचबरोबर कार्य करण्यासाठी आवश्यक ते अधिकार देणे. त्यासाठी लागणारा पैसा व आवश्यक साधने याचीही उपलब्धता करून देणे आणि त्याद्वारे आपली निश्चित ध्येय साध्य केली जातात.

कुटुंबात व समाजात अशा अनेक महिला आहेत. संघटन शक्तिचा योग्य उपयोग करून ठरविलेली  उद्दिष्ट प्राप्त करून घेत असतात.

**संघटन कौशल्ये असणाऱ्या महिला :**

कौटुंबिक कार्य हे संघटन कौशल्यावरच अवलंबून असते. नियोजित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उपलब्ध मनुष्यबळ, माल, पैसा आणि साधनांचा एकत्रित विचार करून त्याचा ध्येयपूर्तीकरिता योग्य वापर करणे म्हणजे संघटन होय. हे कौशल्य असल्याने कुटुंबातील सर्व सभासदांना संघटीत ठेवता येते व आपले कौटुंबिक उद्दिष्ट साध्य होते. महिलामध्ये असलेली संघटन कौशल्यांचा अभ्यास करण्यात आला असून त्याचा तपशील पुढील सारणीत दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. 4.19**

**संघटन कौशल्य असणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | संघटन कौशल्य | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | सहकार्य वृत्ती वाढली | 148 | 29.60% |
| 2 | एकीच्या बळाचे महत्व समजले | 250 | 50.00% |
| 3 | कार्यक्षमतेत वाढ झाली | 102 | 20.40% |
| | एकूण | 500 | 100% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.19 नुसार असे दिसून येते की, सहकार्य वृत्ती वाढणाऱ्या महिलांची संख्या 148 (29.60%) इतकी आहे, तर एकीच्या बळाचे महत्व समजणाऱ्या महिलांची संख्या 250 (50%) तर कार्यक्षमतेत वाढ झाली अशा महिलांची संख्या 102 (20.4%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, एकीच्या बळाचे महत्व समजणाऱ्या महिलांची संख्या 250 (50%) सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

### 4.20 ध्येयाची निश्चिती करण्याऱ्या महिला :

ध्येय ठरविणे अत्यंत महत्वाचे कार्य आहे. ध्येय निश्चित झाल्यानंतर ते साध्य करण्यासाठी वाटचाल करावी लागते. ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. ध्येयाची आखणी करणाऱ्या महिलाची सारणी महिलांची सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**सारणी क्र. 4.20**

**ध्येयाची आखणी करण्याऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | ध्येयाची आखणी करण्याऱ्या महिला | महिलांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 478 | 95.6% |
| 2 | नाही | 022 | 04.4% |
| | एकूण | 500 | 100.0% |

स्त्रोत:- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.20 नुसार असे दिसून येते की, ध्येयाची आखणी करणाऱ्या महिलांची संख्या 478(95.6%%) इतकी आहे. ध्येयाची आखणी न करणाऱ्या महिलांची संख्या 22(4.4% %) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, ध्येयाची आखणी करणाऱ्या महिलांची संख्या 478(95.6% %) सर्वाधिक आहे.

## 4.21 ध्येयाप्रमाणे कार्य करणाऱ्या महिला :

ध्येय ठरविल्याने त्याप्रमाणे किती महिला कार्य करतात व ध्येय ठरविल्याने त्याप्रमाणे किती महिला कार्य करीत नाहीत हे दर्शविणारी सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**सारणी क्र. 4.21**

**ध्येयाप्रमाणे कार्य करणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | ध्येयाप्रमाणे कार्य करणाऱ्या महिला | महिलांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 463 | 92.6% |
| 2 | नाही | 037 | 07.4% |
| | एकूण | 500 | 100% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.21 नुसार असे दिसून येते की, ध्येयाप्रमाणे कार्य करणाऱ्या महिलांची संख्या 463(92.6%) इतकी आहे. तर ठरविलेल्या ध्येयाप्रमाणे कार्य पूर्ण न होणाऱ्या महिलांची संख्या 37 (07.4%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, ध्येयाप्रमाणे कार्य करणाऱ्या महिलांची संख्या 463 सर्वाधिक आहे.

## 4.22 गरजेनुसार कार्याची आखणी करणाऱ्या महिला :

कोणते कार्य आपल्या कुटुंबासाठी गरजेचे आहे. हे ओळखून निर्णय घेतले जातात. कमी गरजेच्या कार्याला दुय्यम स्थान व जास्त गरजेच्या कार्याला प्रथम स्थान दिले जाते. गरजेनुसार कार्याची आखणी करणा-या महिलांची सारणी पुढील प्रमाणे आहे.

**सारणी क्र. 4.22**

**गरजेनुसार कार्याची आखणी करणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | गरजेनुसार कार्याची आखणी करणाऱ्या महिला | महिलांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 475 | 95% |
| 2 | नाही | 025 | 05% |
| | एकूण | 500 | 100% |

स्त्रोत:- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.22 नुसार असे दिसून येते की, गरजेनुसार कार्याची आखणी करणाऱ्या महिला 475 (95%) इतकी आहे. तर गरजेनुसार कार्याची आखणी न करणाऱ्या महिलांची संख्या 25 (5 %) आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, गरजेनुसार कार्याची आखणी करणाऱ्या महिला 475 (95%) सर्वाधिक आहे.

### 4.23 गरजेनुसार तीव्रतेनुसार कार्याची आखणी करणाऱ्या महिला :

कुटुंबातील सर्वच गरजांची तीव्रता सारखी असते असे नाही. काही गरजा जास्त गरजाच्या असतात त्या अत्यावश्यक असतात, तर काही गरजांची तीव्रता मध्यम असते त्या काही कालांतराने पूर्ण केल्या तरी चालतात, तसेच काही गरजाची तीव्रता कमी असते. गरजेच्या तीव्रतेनुसार कार्याची आखणी करणाऱ्या महिलांची सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**सारणी क्र. 4.23**

**गरजेनुसार तीव्रतेनुसार कार्याची आखणी करणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | विवरण | महिलांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | जास्त गरजेची कार्य | 385 | 77% |
| 2 | मध्यम गरजेची कार्य | 100 | 20% |
| 3 | कमी गरजेची कार्य | 015 | 03% |
| | एकूण | 500 | 100% |

स्त्रोत:- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.23 नुसार असे दिसून येते की, जास्त गरजेची कार्य करणाऱ्या महिलांची संख्या 385 (77%) इतकी आहे.तर मध्यम गरजेची कार्य करणाऱ्या महिलांची संख्या 100(20%) आहे तसेच कमी गरजेची कार्य करणाऱ्या महिलांची संख्या 15 (3 %) आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, जास्त गरजेची कार्य करणाऱ्या महिलांची संख्या 385 (77%) सर्वाधिक आहे.

### 4.24 कुटुंबातील व्यक्तिची जबाबदारी निश्चित करणे :

कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिला कार्य दिल्यानंतर जबाबदारी ठरविली पाहीजे. जबाबदारी निश्चित केल्याने प्रत्येकजण त्याचे काम जबाबदारीने पूर्ण करतो. त्या कार्यात काही उणीवा आढळल्यास त्या दूर केल्या जातात. ते कार्य यशस्वीरित्या पूर्ण के ले जाते. कुटुंबातील व्यक्तिची जबाबदारी निश्चित करणाऱ्या महिलांची सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**सारणी क्र. 4.24**

**कुटुंबातील व्यक्तिची जबाबदारी निश्चित करणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | कुटुंबातील व्यक्तिची जबाबदारी निश्चित करणाऱ्या महिला | महिलांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 448 | 89.6% |
| 2 | नाही | 052 | 10.4% |
| | एकूण | 500 | 100% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.24 नुसार असे दिसून येते की, कुटुंबातील व्यक्तिची जबाबदारी निश्चित करणाऱ्या महिलांची संख्या 448(89.6%) इतकी आहे. कुटुंबातील व्यक्तिची जबाबदारी निश्चित न करणाऱ्या महिलांची संख्या 52(10.4%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, कुटुंबातील व्यक्तिची जबाबदारी निश्चित करणाऱ्या महिलांची संख्या 448(89.6%) सर्वाधिक आहे.

**4.25 कुटुंबातील व्यक्तिला अधिकार प्रदान करणे :**

एखादी आपणास जबाबदारी दिली जाते तेव्हा ते कार्य करण्यासाठी काही अधिकाराचीही गरज निर्माण होते. ती जबाबदारी पूर्ण करण्यासाठी काही अधिकार देणे गरजेचे असते. कारण तेव्हाच ती जबाबदारी आपण यशस्वीपणे पार पाडू शकतो. कुटुंबात अनेक कार्य असतात ते कार्य यशस्वी होण्यासाठी अधिकाराचीही गरज असते. अधिकार प्रदान करणाऱ्या महिलांची सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**सारणी क्र. 4.25**

**कुटुंबातील व्यक्तिला अधिकार प्रदान करणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | कुटुंबातील व्यक्तिला अधिकार प्रदान करणाऱ्या महिला | महिलांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 470 | 94% |
| 2 | नाही | 030 | 06% |
| | एकूण | 500 | 100% |

स्त्रोत:- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.25 नुसार असे दिसून येते की, कुटुंबातील व्यक्तिला अधिकार प्रदान करणाऱ्या महिलांची संख्या 470 (94%) इतकी आहे. तर कुटुंबातील व्यक्तिला अधिकार प्रदान न करणाऱ्या महिलांची संख्या 30 (6%) आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, कुटुंबातील व्यक्तिला अधिकार प्रदान करणाऱ्या महिलांची संख्या 470 (94%) सर्वाधिक आहे.

### 4.26 कुटुंबातील मानवी शक्तिचा वापर करणे :

कुटुंबात अनेक व्यक्ति असतात. प्रत्येक व्यक्तिला त्यांच्या आवडीनुसार, कुवतीनुसार, शारिरीक क्षमतेनुसार कार्याचे वाटप करावे लागते. कुटुंबातील मानवी शक्तिचा पुरेपूर वापर करणाऱ्या महिलांची सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**सारणी क्र. 4.26**

**कुटुंबातील मानवी शक्तिचा वापर करणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | कुटुंबातील मानवी शक्तिचा वापर करणाऱ्या करणाऱ्या महिला | महिलांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 439 | 87.8% |
| 2 | नाही | 061 | 12.2% |
| | एकूण | 500 | 100% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.26 नुसार असे दिसून येते की, कुटुंबातील मानवी शक्तिचा वापर करणाऱ्या करणाऱ्या महिलांची संख्या 439 (87.8%) इतकी आहे. तर कुटुंबातील मानवी शक्तिचा वापर न करणाऱ्या करणाऱ्या महिलांची संख्या 61 (12.2 %) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, कुटुंबातील मानवी शक्तिचा वापर करणाऱ्या महिलांची संख्या 439 (87.8%) सर्वाधिक आहे.

### 4.27 नवीन तंत्रज्ञानाचा वापर :

आधुनिक तंत्रज्ञानामुळे मानवाच्या जीवनशैलीत बदल झाले आहे. कार्य अधिक सुलभ झाले आहे. उदा. स्वयंपाक करण्यासाठी पूर्वी चुलीचा, स्टोव्हचा, लाकडाच्या भूश्यांची शेगडी, कोळशाचा वापर केला जात असे. पाणी गरम करण्यासाठी चूल, शेगडयांचा वापर केला जात असे. यात अनेक

अडचणींना सामोरे जावे लागत असे, धुरांमुळे डोळयांना त्रास अनेक आजार उद्वत असत. नवीन तंत्रज्ञानामुळे चुलीची जागा गॅसनी घेतलेली आहे. गरम पाण्यासाठी गिजर, सोलार यांनी घेतली आहे. स्वयंपाकघरात अनेक आधुनिक उपकरणांनी प्रवेश केला आहे. यामुळे वेळेची व श्रमाची बचत होते. कुटुंबात अनेक आधुनिक उपकरणांचा वापर करणाऱ्या महिलाची सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**सारणी क्र. 4.27**

**विविध आधुनिक उपकरणांचा वापर करणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | विवरण | महिलांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | मिक्सर | 167 | 37.40% |
| 2 | फ्रिज | 122 | 24.40% |
| 3 | ओव्हन | 005 | 01.00% |
| 4 | पिठाची गिरणी | 007 | 01.40% |
| 5 | वॉशिंग मशीन | 169 | 33.80% |
| 6 | सोलार | 010 | 10.80% |
| | एकूण | 500 | 100% |

स्त्रोत:- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.27 नुसार असे दिसून येते की, कुटुंबात महिला आपल्या सोयीसाठी विविध उपकरणांचा वापर करताना दिसून येते. मिक्सरचा वापर करणाऱ्या सर्वाधिक 167(37.40%) महिला असल्याचे दिसून येते. तसेच ओव्हन चा उपयोग करणाऱ्या 5 (1%)सर्वात कमी महिला असल्याचे दिसून आले आहे.

### 4.28 मनोबलात वाढ करणाऱ्या महिला :

कुटुंबातील महिला कुटुंबातील व्यक्तिला चांगले काम करण्याची प्रेरणा

देत असतात. प्रत्येक कार्यात प्रोत्साहन दिले जाते. त्यांचे मनोबल वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. एखाद्या कार्यात जरी अपयश आले तरी पुन्हा नव्याने कार्य करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. कुटुंबातील व्यक्तिच्या मनोबलात वाढ करण्यात महिलांचा फार महत्वाचा वाटा आहे.

**सारणी क्र. 4.28**

**कुंटुंबातील सदस्यांना त्यांच्या कार्याबद्दल प्रोत्साहित करणाऱ्या महिलांची सारणी**

| **अ.क्र.** | **विवरण** | **संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| 1 | प्रोत्साहन देणाऱ्या महिला | 485 | 97% |
| 2 | प्रोत्साहन न देणाऱ्या महिला | 015 | 03% |
| | **एकूण** | 500 | 100.00% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.28 नुसार असे दिसून येते की, कुंटुंबातील सदस्यांना त्यांच्या कार्याबद्दल प्रोत्साहित करणाऱ्या महिलाची संख्या 485(97%), कुंटुंबातील सदस्यांना त्यांच्या कार्याबद्दल प्रोत्साहित न करणाऱ्या महिलांची संख्या 15 (3%) इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, कुंटुंबातील सदस्यांना त्यांच्या कार्याबद्दल प्रोत्साहित करणाऱ्या सर्वाधिक महिलाची संख्या 485(97%), आहे.

### 4.29 मुलांचे शैक्षणिक नियोजन करणाऱ्या महिला :

कुंटुंबाचे आधारस्तंभ असणारे मुले यांच्या शिक्षणांविषयी नियोजन करणे अत्यंत महत्वाचे असते. चांगले शिक्षण मुलांना जर मिळाले तर भावी पिढी सुसंस्कृत, सुज्ञान होईल. कुटुंबाचा विकास तर होईलच तसेच देशाची प्रगती होईल. यासाठी मुलांच्या शिक्षणाचे नियोजन करणाऱ्या महिलांची सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**सारणी क्र. 4.29**

**मुलांचे शैक्षणिक नियोजन करणाऱ्या महिलांची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | योग्य शाळेची निवड करणे | 103 | 20.6 % |
| 2 | मुलांकडे वैयक्तिक लक्ष देणे | 200 | 40.0 % |
| 3 | मुलांचा गृहपाठ करून घेणे | 110 | 22.0 % |
| 4 | मुलांच्या प्रगतीविषयी शिक्षकांना भेटणे | 087 | 17.4 % |
| | एकूण | 500 | 100 .0% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.29 नुसार असे दिसून येते की, योग्य शाळेची निवड करणाऱ्या महिलांची संख्या 103(20.6 %) इतकी आहे, तर मुलांकडे वैयक्तिक लक्ष देणाऱ्या महिलांची संख्या सर्वाधिक 200 (40 %) असल्याचे दिसून येते तर मुलांचा गृहपाठ करून घेणाऱ्या महिलांची संख्या 110 (22%) इतकी आहे, शिक्षकांना भेटून मुलांच्या प्रगतीविषयी माहिती विचारणाऱ्या महिलांची संख्या 87 (17.4%) इतकी असल्याचे दिसून येते.

यावरून असे स्पष्ट होते की, मुलांकडे वैयक्तिक लक्ष देणाऱ्या महिलांची संख्या सर्वाधिक 200 (40 %) असल्याचे दिसून आले आहे.

**4.30 योग्य अंदाज पत्रक करणाऱ्या महिला :**

कौटुंबिक कार्य करीत असताना गृहिणी अनुभवानुसार प्रत्येक कार्याचे अंदाज करणे शक्य होते. उदा. दैनंदिन खर्च, मासीक किराणा, वर्षासाठी अन्नधान्य हे कार्य करीत असताना अनुभवानुसार त्यात परिपक्वता येते. कौटुंबिक कल्याणासाठी सतत कार्यरत असणाऱ्या महिलांना अंदाज पत्रकाचे योग्य ज्ञान असते. अनुभवानुसार, कार्याचे निरीक्षण करून अंदाजपत्रक तयार करीत असतात. काही वेळेला अंदाज चुकतात त्या वस्तूची कमतरता जाणवते

त्यास तुटीचे अंदाजपत्रक म्हणतात, तर ती वस्तू शिल्लक राहते त्यास शिल्लकीचे अंदाजपत्रक म्हणतात तर शिल्लकही राहत नाही व कमीही पडत नाही त्या समतोलाचे अंदाजपत्रक म्हणतात. अंदाजपत्रक तयार करणाऱ्या महिलांचे विवरण पुढील सारणीत दिलेले आहे.

**सारणी क्र. 4.30**

**योग्य अंदाज पत्रक करणाऱ्या महिलाची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | तुटीचे अंदाजपत्रक | 147 | 29.40 % |
| 2 | शिल्लकी अंदाजपत्रक | 153 | 30.60 % |
| 3 | समतोलाचे अंदाजपत्रक | 175 | 35.00% |
| 4 | अंदाजपत्रक न करणाऱ्या महिला | 025 | 05.00 % |
| | एकूण | 500 | 100 .00% |

स्त्रोतः- प्राथमिक सर्वेक्षण

वरील सारणी क्र. 4.30 नुसार असे दिसून येते की, तुटीचे अंदाजपत्रक करणाऱ्या महिलांची संख्या 147 (29.40%)आहे, शिल्लकी अंदाजपत्रक करणाऱ्या महिलांची संख्या 153 (30.60%) आहे, समतोलाचे अंदाजपत्रक करणाऱ्या महिलांची संख्या 175 (35.00%) इतकी आहे तर अंदाजपत्रक न करणाऱ्या महिलांची संख्या 25 (5.00%)इतकी आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, समतोलाचे अंदाजपत्रक करणाऱ्या महिलांची संख्या 175 (35.00%) सर्वाधिक असल्याचे दिसून येते.